# नांदेडचे माकूरवार तीन लाखांच्या दागिन्यांचे मानकरी

## 'अ‍ॅग्रोवन शुभलाभ योजने'ची सोडत : चौदाशेवर शेतकरी ठरले बक्षिसांचे विजेते

**पुणे (प्रतिनिधी) :** बारा महिने हजार समस्यांशी झुंजत कष्टाने शेती करणाऱ्या अ‍ॅग्रोवनच्या शेतकरी वाचकांसाठी आयोजिलेल्या 'अ‍ॅग्रोवन शुभलाभ योजने'ची सोडत आज समारंभपूर्वक काढण्यात आली. राज्यभरातील वाचकांमध्ये प्रचंड उत्सुकता लागून असलेल्या या योजनेत शेतकऱ्यांनी विक्रमी सहभाग नोंदविला होता. विविध स्वरूपाच्या १४२४ बक्षिसांसाठी आलेल्या हजारो प्रवेशिकांमधून भाग्यवान शेतकऱ्यांची नावे सोडतीद्वारे काढण्यात आली. तीन लाख रुपयांचे हिऱ्याच्या दागिन्यांचे पहिले बक्षीस नांदेडचे शेतकरी साईनाथ गंगाधर माकूरवार यांना मिळाले आहे.

तीन सप्टेंबर ते १४ डिसेंबर २०१७ या कालावधीत 'अ‍ॅग्रोवन'च्या शेतकरी वाचकांसाठी ही राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली. पु. ना. गाडगीळ आणि सन्स, स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज लिमिटेड, पारस इंडस्ट्रीज, रोहित स्टील, अ‍ॅग्रोस्टार, अ‍ॅन्डस्लाईट असे नामवंत प्रायोजक या स्पर्धेला लाभले.

'अ‍ॅग्रोवन'च्या पुणे मुख्यालयात योजनेचा सोडत कार्यक्रम टाळ्यांच्या गजरात पार पडला. या वेळी व्यासपीठावर पु. ना. गाडगीळ आणि सन्सचे सीईओ अमित मोडक, स्मार्टकेम टेक्नॉलॉजीजचे उपसरव्यवस्थापक सतीश नरतम व संजय जगताप, पारस इंडस्ट्रीजचे केतन लोढा, रोहित स्टीलचे व्यवस्थापक अनुप मोदी, अ‍ॅग्रोस्टारचे सहायक व्यवस्थापक दुर्गाप्रसाद उपाध्याय, अ‍ॅन्डस्लाइट कंपनीचे महाराष्ट्र राज्य सुपर स्टॉकिस्ट प्रकाश शिंदे तसेच अ‍ॅग्रोवनचे संपादक आदिनाथ चव्हाण, सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले, मुख्य व्यवस्थापक (वितरण) चंद्रशेखर जोशी उपस्थित होते.

या योजनेतील शेतकऱ्यांसाठी पु. ना. गाडगीळ आणि सन्स यांच्यातर्फे यांनी एकूण सहा लाख रुपये किमतीच्या हिऱ्यांच्या दागिन्यांची पाच बक्षिसे ठेवली होती. श्री. मोडक यांच्या हस्ते निघालेल्या सोडतीत तीन लाख रुपयांच्या हिऱ्याच्या दागिन्यांचे पहिले बक्षीस नांदेडचे शेतकरी साईनाथ गंगाधर माकूरवार यांना मिळाले. त्यांना स्वतः श्री. मोडक यांनी सोडत सोहळ्यातूनच दूरध्वनीवरून संपर्क साधून ही गोड बातमी दिली. ''यंदा पाऊस चांगला झाला आहे. अ‍ॅग्रोवनमुळे शेतीमधील ज्ञान आणि चांगली माहिती तुम्हाला मिळतेच आहे. पण आता तीन लाखाचे बक्षीस देखील तुम्हाला मिळाले आहे. अ‍ॅग्रोवनमुळे तुम्ही भाग्यवान शेतकरी ठरला आहात,'' अशा शब्दांत श्री. मोडक यांनी शेतकरी श्री. माकूरवार यांना शुभेच्छा दिल्या.

अ‍ॅग्रोवनचे संपादक आदिनाथ चव्हाण यांनी प्रास्ताविकात अ‍ॅग्रोवनच्या वाटचालीची माहिती दिली. सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले यांनी स्पर्धेची व प्रतिसादाची माहिती दिली. सूत्रसंचलन अ‍ॅग्रोवनचे वरिष्ठ व्यवस्थापक संभाजी घोरपडे यांनी केले.



**पुणे : अ‍ॅग्रोवन शुभलाभ योजनेची सोडत गुरुवार (ता. २५) काढण्यात आली. प्रमुख विजेत्यांच्या प्रवेशिका जाहीर करताना डावीकडून अ‍ॅग्रोवनचे संपादक आदिनाथ चव्हाण, स्मार्टकेम टेक्नॉलॉजीजचे संजय जगताप, अ‍ॅग्रोस्टारचे सहायक व्यवस्थापक दुर्गाप्रसाद उपाध्याय, पु. ना. गाडगीळ आणि सन्सचे सीईओ अमित मोडक, अ‍ॅन्डस्लाइट कंपनीचे महाराष्ट्र राज्य सुपर स्टॉकिस्ट प्रकाश शिंदे, स्मार्टकेम टेक्नॉलॉजीजचे उपसरव्यवस्थापक सतीश नरतम, रोहित स्टीलचे व्यवस्थापक अनुप मोदी, पारस इंडस्ट्रीजचे केतन लोढा, अ‍ॅग्रोवनचे सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले.**

पु. ना. गाडगीळ आणि सन्स
महाधन एक अतूट नातं!
पारस ठिबक/तुषार सिंचन
ANDSLITE
AgroStar 1800 3000 7345
Rohit Krishi Industries Pvt. Ltd.

### योजनेचे प्रमुख विजेते



साईनाथ माकूरवार



विठ्ठल मोहिते



बालाजी हरकरे



अर्चना इंगळे



विश्वास देशमुख

### शुभलाभ योजनेतील प्रमुख बक्षिसांचे मानकरी

» **पहिले बक्षीस** (पु. ना. गाडगीळ आणि सन्स यांचे तीन लाखाचे हिऱ्यांचे दागिने) साईनाथ गंगाधर माकूरवार (सावळी, ता. बिलोली, जि. नांदेड)

» **दुसरे बक्षीस** (पु. ना. गाडगीळ आणि सन्स यांचे दोन लाखाचे हिऱ्यांचे दागिने) विठ्ठल नामदेव मोहिते (लऊळ, माढा, सोलापूर)

» **तिसरे बक्षीस (संख्या ३)** (पु. ना. गाडगीळ आणि सन्स यांचे एक लाखाचे हिऱ्यांचे दागिने) बालाजी भा. हरकरे (विडूळ, उमरखेड, यवतमाळ), अर्चना ज्ञानेश्वर इंगळे (दाबका, उमरगा, उस्मानाबाद), विश्वास वा. देशमुख (नांदुरा, बुलढाणा)

» **चौथे बक्षीस (संख्या २)** (रोहित स्टीलचे ६० हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) रामप्रसाद प्रकाश धोंगडे (तिवरंग, उमरखेड, यवतमाळ), खंडेराव माधवराव शिंदे (ओझरमिग, निफाड, नाशिक).

» **पाचवे बक्षीस (संख्या २)** (रोहित स्टीलचे ५४ हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) मयुर शिवाजी जगदाळे (आंधळी, पलुस, सांगली), हरिभाऊ कचरू हाळनोर (कोळपेवाडी, कोपरगाव, नगर)

» **सहावे बक्षीस (संख्या २)** (पारस इंडस्ट्रीजचे ५० हजाराचे ठिबक सिंचन संच) महावीर हावळे (आळते, कोल्हापूर), पाशा वजीरसाब तांबोळी (हाळी, उदगीर, लातूर)

» **सातवे बक्षीस (संख्या ३)** (रोहित स्टीलचे ३८ हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) संभाजी धोंडिराम बोराडे (शेगाव, जत, सांगली), विलास हरसिंग जामदार (वेळापूर, माळशिरस, सोलापूर), अस्लमअली खाँ उस्मानअली खाँ (परतूर,जालना)

» **आठवे बक्षीस (संख्या २)** (पारस इंडस्ट्रीजचे ३७५०० हजाराचे स्प्रिंकलर संच) सुनील वि. परिहार (भालगाव, बुलढाणा), गोपाळ कि. पाटील (पडधाळे, जळगाव),

»**नववे बक्षीस (संख्या ३)** (रोहित स्टीलचे ३१ हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) प्रकाश विश्वासराव पाटील (बेडग, मिरज, सांगली), प्रल्हाद लालचंद बच्छाव (सोयगाव, मालेगाव, नाशिक), जगदीश श्रीहरी म्हस्के (गडचिरोली),

» **दहावे बक्षीस (संख्या २)** (रोहित स्टीलचे २१ हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) कविता खाशाबा राऊत (गोरखपूर, सातारा), उमेश रघुनाथ रामाणे (वाफगाव, खेड, पुणे),

» **अकरावे बक्षीस (संख्या ३)** (रोहित स्टीलचे सात हजाराचे बियाणे-खते पेरणीयंत्र) प्रताप बबनराव जाधव (बारामती, पुणे), सदाशिव जानकीराम जगताप (पुंगळा, जिंतूर, परभणी), संपतराव केशवराव नलावडे (नागठाणे, सातारा) या विजेत्यांना अ‍ॅग्रोवनतर्फे बक्षीस वितरणाचा तपशिल पत्राद्वारे कळविण्यात येईल. याशिवाय स्मार्टकेम टेक्नॉलॉजीजकडून प्रत्येकी पाच हजार रुपये किंमतीची रासायनिक खताची १०० बक्षिसे दिली जात आहेत. पारस इंडस्ट्रीजकडून प्रत्येकी एक हजार रुपये किमतीचे पारसची मिरॅकल उत्पादने ३२५ विजेत्यांना मिळतील. अ‍ॅग्रोस्टार कंपनीकडून ५०० विजेत्यांना प्रत्येकी एक हजार रुपयांची गिफ्ट कुपन्स मिळणार आहेत. अ‍ॅन्डस्लाइट कंपनीकडून ४७५ विजेत्यांना ८४५ रुपये किमतीची नॅनो रिचार्जेबल बॅटरी दिली जाणार आहे. **या भाग्यवान विजेत्यांची नावे येत्या ५ फेब्रुवारीपासून अ‍ॅग्रोवनच्या अंकात क्रमशः प्रसिद्ध होणार आहेत.**

सकाळ अ‍ॅग्रोवन आयोजित
व्यंकटेश अ‍ॅग्रोटेक प्रा. लि. नाशिक प्रायोजित
अ‍ॅग्रोवन संवाद
'अ‍ॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद
कार्यक्रम वेळापत्रक
रविवार, २८ जानेवारी २०१८
विषय - ऊस पीक व्यवस्थापन
वक्ते - प्रा. संदिप जायभाये
(कृषी विद्यावेत्ता, केव्हीके, पोखर्णी, नांदेड)
डॉ. प्रशांत नाईकवाडी
(सेंद्रिय शेती अभ्यासक)
स्थळ - मारोती मंदिर, दाभड, ता. अर्धापूर, जि. नांदेड
वेळ - सकाळी ९ वाजता
या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.

तंदुरुस्त राहा, देखणे दिसा
फक्त १ कॅप्सूल सकाळी आणि १ संध्याकाळी घ्या
जॉली फॅट-गोमध्ये आहे एक प्रभावी, अत्याधुनिक आणि आयुर्वेदिक फॉर्म्युला जो बनविला आहे ग्रीन टी, पायनापल, गार्सिनिया कॅम्बोजियासारख्या १५ उत्कृष्ट जडी-बुटींपासून ! साईड इफेक्ट नाही, जॉली फॅट-गो महिला आणि पुरुष दोघांसाठीही अत्यंत प्रभावी आहे.


अधिक चांगला गुण येण्यासाठी 'जॉली फॅट-गो' पावडर, एक ग्लास स्कीम्ड मिल्कमध्ये मिसळा, चांगल्याप्रकारे हलवा आणि हे पेय जेवणाऐवजी घ्या. शरीरावरील ताणलेल्या सुरकुत्या आणि पोट व मांड्यांवरील चरबीच्या लोंबणाऱ्या वळ्या घालवण्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी 'जॉली फॅट-गो ऑईल'ने चांगला मसाज करा.
जॉली फॅट-गो कोणतेही दोन बॉक्सेस खरेदी करा आणि एक जॉली ऑरगॅनिक ग्रीन टी मोफत प्राप्त करा. (किंमत ₹ 177/-)


JOLLY FAT-GO
स्लिमिंग कॅप्सूल, पावडर आणि तेल
सर्व अग्रगण्य मेडिकल स्टोअर्समध्ये उपलब्ध | Helpline: 78143-66633